# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७५८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/११/२०१६

**१) विदयुत ट्रान्सफार्मर मधील आईलची चोरी . :–**

दिनांक १६/११/२०१६ रोजी १०.१० वादि.१७/११/१६ चे १८.०० वा. दर. यातील सुंदरी व सिरसी शेतशिवारातील विदयुत ट्रन्सफार्मर क्र. ४३९१९२४४३९१९४७ मधुन एकुन ३५० लिटर ऑईल कि. ३०,०००/रू चा कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. सहकलम १३६ भा.वी.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ.गोंडगे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) शेतात ठेवलेल्या धनाच्या पुंजण्याला आग लावुन नुकशानी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १९/११/२०१६ चे ००.३० वा. ते ०२.०० दर. यातील फिर्यादी दुर्गेश केशवराव बागडे वय २६ वर्ष रा. डोंगरगाव हा व त्याचे चुलत भावु यांचे शेतातील बांधीत चुरणा पुरण्याकरीता रचुन ठवलेल्या जयश्रीराम धानाच्या २ गंजी (पुंजने) कि. ७३,०००/रू. चे कोणीतरी अज्ञात आरोपीने आग लावुन जाळुन नुकसानी केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बाबरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) वाहतुकीस अडथडा निर्माण करणा–या वाहणावर कारवाई . :–**

दिनांक १९/११/२०१६ चे १४.०० वा. ते १४.३० दर. यातील आरोपी वाहन चालकाने आले ताब्यातील वाहन आमरोडवर उभी करून येणा–या जाणा–या लोंकाना व वाहतुकीस अडथडा निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना रामटेके यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना रामटेके पो.स्टे. पवनी करीत आहेत

**४) मुलीचा मिरगीच्या त्रासाने उपचारा दरम्यान मृत्यु. :–**

दिनांक १९/११/२०१६ चे ११.०० वा. दर. यातील मृतक कु.दुर्गा समय भलावी वय १५ वर्ष रा. पवनारखरी हीला अचानक मिरगीचा दौरा आल्याने ती बेशुध्द पडली तिला औषधउपचाराकरीता दवाखाण्यात नेत असतांना मरण पावल्याने फिर्यादी क्रिष्णा समरू भलावी वय २५ वर्ष रा. पवनारखरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पो.स्टे. गोबरावाही हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १९/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ९५ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस, अवैध प्रवासी ०३ व ईतर वाहनांवरती ८४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.